प्रकरण पाचवे

# तात्यासाहेबांचे सामाजिक, आर्थिक व इतर क्षेत्रातील कार्य

✵ प्रकरण पाचवे ✵

# तात्यासाहेबांचे सामाजिक, आर्थिक व इतर क्षेत्रातील कार्य

**प्रस्तावना :-**

वारणा परिसराच्या विकासासाठी अहोरात्र कष्ट करून अनेक उद्योग व शिक्षण समूहाचे जाळे निर्माण करणारे तात्यासाहेब कोरे यांनी सहकार तसेच सामाजिक क्षेत्रातही कार्य केले आहे. तात्यासाहेबांची वारणा साखर कारखाना, दूध प्रकल्प, शैक्षणिक संस्था याविषयी मागील तीन प्रकरणामध्ये संशोधनात्मक पद्धतीने अभ्यास केला आहे. तेव्हा या प्रकरणामध्ये त्यांच्या सामाजिक, आर्थिक, तसेच इतर क्षेत्रातील कार्याचा तात्यासाहेब कोरे-ग्रामीण नेतृत्वाचा अभ्यास करताना करणे गरजेचे आहे. वारणेमध्ये अनेक संस्था उभ्या राहिल्या आहेत, त्या सर्व संस्थांचा आधार मात्र वारणा सहकारी साखर कारखाना आहे. कारखान्याने प्रत्येक संस्थेला मदतीचा हात दिला म्हणूनच वारणानगर आकारास आले. या प्रकल्पामध्ये प्रामुख्याने श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ, कुक्कुटपालन सहकारी संस्था, वारणा सहकारी बँक, वारणा बझार, महिला संस्था यांचा संशोधनात्मक पद्धतीने अभ्यास केलेला आहे.

वरील काही संस्था ह्या सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या आहेत. त्यांचा उत्कृष्ठ नमुना म्हणजे वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ या संस्थेने ग्रामीण भागात शेतीसाठी पाणी पुरवठा योजना, ज्ञान ही एक मोठी संपत्ती असल्यामुळे शैक्षणीक सुविधा पुरवणे, किसान साक्षरता योजना इत्यादी सामाजिक कार्य केले आहे आणि आजही करत आहे. वारणा बँक ही ग्रामीण भागात आर्थिक सुविधा पुरविणारी बँक आहे. वारणा परिसरात मुख्य व्यवसाय म्हणजे शेती, त्यास सहाय्य करणारी व शेतीमालावर प्रक्रिया

करणाऱ्या संस्थांना पैसा पुरविणे; हा मुख्य उद्देश ठेवून बँक स्थापन झाली. ज्या उद्देशासाठी ही बँक स्थापन झाली, तो उद्देश शंभर टक्के यशस्वी झाला आहे. शेती व्यवसायाला जोड धंदा म्हणजे दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालन होय. वारणेच्या दूधाने आपली कीर्ती संपूर्ण देशभर केली आहेच. शिवाय कुक्कुटपालन हा व्यवसाय अनिश्चिततेचा पण वारणानगर मध्ये तो यशस्वी झाला आहे. शेतीला खऱ्या अर्थाने जोड धंदा म्हणून तो व्यवसाय यशस्वी झाला आहे. वारणानगर मध्य अनेक विकासाची कामे झाली आहेत. वारणा म्हणजे विकास हे जसे समीकरण झाले आहे. त्याप्रमाणे वारणा बझार म्हणजे, प्रत्यही नवनवे विक्रम असेही समीकरण झाले आहे. ह्या बझारची वार्षिक विक्री ४३ कोटी रूपयेच्या वर असून ग्रामीण भागात एवढ्या मोठ्या प्रमाणात काम करणारी देश पातळीवरील एकमेव संस्था आहे. ग्राहकांना अत्यंत चांगल्या पद्धतीने सेवा पुरविली आहे. याशिवाय वारणा भगिनी मंडळ व महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्रासारख्या संस्था स्थापन करून, महिलांची शक्ती वाया जावू नये यासाठी तात्यासाहेबांनी वरील संस्था स्थापन केल्या आहेत. समाजसुधारण्यासाठी ह्या समाजातील आर्धी शक्तीला काम दिले आहे.

वरील संस्था तात्यासाहेबांनी स्थापन केल्या. त्यांना अनेक अडचणीतून बाहेर काढून समाजाच्या सेवेसाठी काम करण्याचा प्रयत्न केला आहे. तात्यांनी आपल्या अखेरच्या काळात महात्मा गांधी मेडिकल ट्रस्ट स्थापन करून समाजाची आरोग्य सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. आरोग्य उत्तम असेल तर सर्व काही करता येते, यासाठी त्यांनी हा ट्रस्ट स्थापला. तात्यासाहेबांच्या पश्चात ह्या सर्व संस्था मा. आमदार विनय कोरे (सावकर) यांच्या सहकार क्षेत्रात घालून दिलेला आदर्श पुढे चालविण्याचे काम विनयरावजी करत आहेत. त्यांना तसे यशही आले त्याचा सविस्तर अभ्यास तात्यासाहेबांचा संकल्प आणि वारसा ह्या प्रकरणामध्ये येणार आहे.

**विधायक कार्यासाठी स्थापन केलेले श्री. वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ :-**

म. गांधी जन्मशताब्दी महोत्सव १९६८ मध्ये सर्वत्र साजरा करण्यात आला. यावर्षी वारणा कारखान्याच्या परिसरातील त्यावेळच्या ६६ गावांत विधायक कार्य करण्याचा संकल्प सोडण्यात आला. यासाठी भागातील कार्यकर्त्यांच्या बैठकी घेण्यात आल्या. आणि सर्वांच्या विचाराअंती ८ एप्रिल १९६९ ला 'श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळाचे कामकाज सुरू झाले.' या संस्थेने व्यक्तीगत तसेच सामूहिक स्वरूपाची विधायक कार्ये करून सर्वांसाठी आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक इ. कामे केली आहेत. "अर्थात कोणत्याही संस्थेला आपले कार्य करण्यासाठी आर्थिक पाठबळ असणे आवश्यक असते. त्यासाठी कारखान्याच्या ऊसकरी शेतकऱ्यांनी प्रत्येक टनाला एक रूपया असा गांधी जन्मशताब्दी निधी निर्माण करून दोन लाख सतरा हजार रूपये एवढा निधी ह्या संस्थेला देण्यात आला."[१]

या संस्थेने प्रारंभी शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी विविध योजना आखल्या. त्या योजनाद्वारा वारणा परिसरात पाण्याची सोय करून कारखान्याला ऊस पुरवठा करण्याच्या कामी मदत केली. प्रथम शेतकऱ्यांसाठी व्यक्तीगत स्वरूपाची कामे कली. उदा. नवीन विहिरी काढणे, जुन्या दुरूस्त करणे, पाईप लाईन घालणे इ. कामे केली त्याचा परिणाम ५०० एकर जमीन बागायती स्वरूपाची झाली. तसेच सामुहिक स्वरूपासाठी उपसा जलसिंचन योजना कामे पूर्ण करण्यासाठी मंडळाकडून प्रयत्न करण्यात आला. जिराईत जमिनीचे रूपांतर बागाईत जमिनीमध्ये करण्याकरिता अनेक योजनांची पाहणी करण्यात आली व त्यापैकी काही योजना पूर्ण करण्यात आल्या आहेत. उदा. सावर्डे-लाटवडे वारणा शेती पाणी पुरवठा योजना, तळसंदे-पारगांव जलसिंचन योजना, श्री हनुमान शेती पाणी पुरवठा योजना भेंडवडे या योजना पूर्ण करण्यासाठी संवर्धक मंडळाने मोठ्या प्रमाणात काम केले, त्यामुळे जिराईत जमिनीचे रूपांतर बागाईत

जमिनीमध्ये करण्यात आले. तसेच शासनाकडून तलावाची कामे मंजुर करण्यासाठी मंडळाने प्रयत्न केला. मनपाडळे, ता. हातकणंगले व कार्वे, ता. वाळवा या ठिकाणी दोन तलाव शासनाकडून मंजूर करून अनुक्रमे १००० व ६०० एकर जमिन पाण्याखाली आणली. मंडळामार्फत सुरवातीला शेती पाणी पुरवठा करण्याचे काम हाती घेतले नंतर ही कामे स्वत: वारणा सहकारी साखर कारखान्याने हाती घेतली व नंतर अनेक उपसा जलसिंचन योजना सुरू झाल्या.

**बालवाड्या आणि वाचनालय :-**

सत्कार्य संवर्धक मंडळाने प्रामुख्याने शिक्षणाची आवड लहानपणीच मुलांच्यामध्ये निर्माण व्हावी यासाठी बालवाड्या स्थापन केल्या आहेत. बालवाडी म्हणजे शिक्षणाचा पाया आहे. त्यासाठी या सत्कार्य संवर्धक मंडळाचे अध्वर्यू आणि तात्यासाहेबांचे गुरूतुल्य मित्र आणि वारणेच्या विकासाचे साक्षीदार माननीय स. आ. तथा बापूसाहेब गुळवणी यांनी आपले ज्ञान, आपली प्रज्ञा, धन, श्रम वेचले आहे. त्यांच्या कष्टातून आज कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावात बालवाड्या चालविल्या जातात. आधुनिक पद्धतीने बालवाड्या-इमारती बांधण्यासाठी, कारखाना, विभाग विकास निधीतून, प्रत्येक बालवाडी इमारतीसाठी २० ते २२ हजार रूपये खर्च करण्यात येतो. पण अलीकडील काळात इमारत बांधकामासाठी खर्च वाढला आहे. पण कारखान्याने स्वीकारलेली ती सामाजिक बांधिलकी आहे. त्यामुळे गरजेनुसार ज्या गावातून बालवाडीसाठी मागणी येईल. त्या गावात ग्रामस्थांनी इमारतीसाठी लागणारी मोफत जागा आणि लोकवर्गणी म्हणून ५००० रूपये कारखान्याकडे जमा केल्यानंतर कारखाना विभाग विकास निधीतून रू. २५,००० खर्च करण्यात येतो. आणि इमारती बांधून कारखाना आपली जबाबदारी संपली असे मानत नाही. तर प्रत्येक बालवाडीसाठी शिक्षिकेचा पगार यासाठी जरूर तो खर्च कारखान्याकडून केला जातो. बालवाडीमध्ये

शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी घेतली जात नाही. तसेच वारणा नदीवर चांदोली धरण झाले, पाण्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणात झाला. त्यामुळे कारखान्याच्या कार्यक्षेत्रात दिवसें-दिवस वाढ होत आहे. त्यामुळे संवर्धक मंडळाचे कार्यक्षेत्रही वाढत आहे. एकूण ५४ बालवाड्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात कार्य करीत असून त्या संस्थेत सातत्याने वाढ होत आहे. "या ५४ बालवाड्यांच्या शिक्षकांचे पगार व इतर खर्चासाठी ९,००० रूपये प्रत्येक वर्षाला अनुदान विभाग विकास निधीतून वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळास देते."[२] अशा पद्धतीने सामाजिक क्षेत्रात शैक्षणिक कार्य करणारे संवर्धक मंडळ १००% यशस्वी झाले आहे. शिक्षण व त्यापासून मिळणारे ज्ञान ही मोठी संपत्ती आहे पण हे शिक्षण तळापासून देणे गरजेचे आहे. ही सामाजिक बांधीलकी ओळखून तात्यासाहेब कोरे यांनी ही संपूर्ण जबाबदारी 'गुळवणीमामा' यांच्यावर सोपविली. त्यांनी ती समर्थपणे पेलली आहे. आजही विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली हे मंडळ आपले कार्य करीत आहे. तात्यांच्या बरोबरीने काम करणारी जुनी माणसे आज वृद्ध झाली किंवा नाहीसी झाली. परंतु त्यांच्या विचाराने चालू झालेली वारणा परिसरात विकासाची कामे मात्र पुढे चालू ठेवण्याचे काम विनय कोरे यांनी केले आहे.

तसेच वारणा परिसरात ग्रामीण भागात याच संस्थेमार्फत चालू केलेले 'तात्यासाहेब कोरे आदर्श ग्रंथालय व आदर्श ग्रंथपाल पुरस्कार' योजना राबविली जाते. प्रतिवर्षी प्रथम क्रमांक येणाऱ्या ग्रंथालयाला व ग्रंथपालाला रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्ह समारंभपूर्वक प्रदान करण्यात येते. यासाठी दहा हजार रूपयांची देणगी कारखाना विभाग विकास निधीतून दिली जाते. वारणा परिसरात चालू असणाऱ्या सरकारमान्य वाचनालयांना प्रतिवर्षी अनुदान स्वरूपात चांगल्या ग्रंथांचे वाटप केले जाते. ग्रंथ हा मानवाचा मित्र निर्माण करण्यास हे मंडळ कार्य करित आहे. याशिवाय ही संस्था सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहे. उदा. आपली

राष्ट्रीय अस्मिता, आपला सांस्कृतिक वारसा, समानतावाद, धर्मनिरपेक्षता, स्त्री-पुरूष समानता इ. आधारभूत घटक धरून कार्य करत असते. शिवाय निबंध स्पर्धा, रांगोळी, चित्रकला, वक्तृत्त्व इ. स्पर्धा घेतल्या जातात. समाजात 'नवा माणूस' घडविण्याचे कार्य केले जाते.

**कुक्कुटपालन सहकारी संस्था :-**

तात्यासाहेब कोरे यांना फार मोठ्या कष्टाने सहकारी साखर कारखाना १९६९ साली उभा केला. हा कारखाना म्हणजे वारणेतील प्रत्येक उद्योगाचा आधार होता. कारखाना चांगल्या पद्धतीने चालू केल्यानंतर वारणेचा शेतकरी केवळ शेती व्यवसायावर अवलंबून न राहता शेतीला जोडधंदा म्हणून दुसरा कोणता व्यवसाय करता येईल; असे तात्यासाहेब विचार करत होते. पण तो व्यवसाय शेतकऱ्यांमध्ये सुरूवात करण्यासाठी वारणा कारखान्याच्या मदतीने आपण प्रथम हा सहकारी तत्त्वावर हा व्यवसाय चालू करावा; असे तात्यासाहेबांना वाटत होते. त्यासाठी प्रथम त्यांनी २७ डिसेंबर १९६३ ला 'श्री वारणा कोंबडी सहकारी संघाची' स्थापना केली. या योजनेसाठी संस्थेने स्वत:चे दोन लाख रूपये भागभांडवल रूपाने जमा करावे. तसेच वारणा सहकारी साखर कारखान्यामार्फत एक लाख रूपये भागभांडवल गुंतवावे. आणि महाराष्ट्र सरकारकडून तीन लाख रूपयाचे भांडवल गुंतवले जाईल; अशी तरतूद करण्यात आली. यासाठी, एका शेअरची किंमत दोन हजार रूपये ठेवली. म्हणजे १०० सभासद करणे गरजेचे होते. पण तात्यासाहेबांच्या नेतृत्त्वावर वारणा परिसरातील लोकांचा एवढा विश्वास होता की, केवळ दीड दिवसात एकशे तीस सभासदांची नोंदणी झाली. दीड दिवसांत दोन लाख साठ हजार एवढी रक्कम १९६३ साली गोळा करणे हा एक विक्रमच होता.

**शेती व्यवसायाला वरदान-कुक्कुट पालन :-**

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सामान्य जिराईत आणि बागायत शेतकऱ्यांना वरदान ठरणारा व्यवसाय म्हणजे कुक्कुट पालन होय. यासाठी १९६३ साली

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

वारणा सहकारी कुक्कुट पालन ही संस्था स्थापन केली. पहिल्या वर्षी ६००० पक्षी आणले आणि कामकाज सुरू केले. पहिल्याच वर्षी निव्वळ नफा १८ हजार रूपये झाला. त्यामुळे हा संघ लवकरच भरभराटीस येईल असे वाटू लागले. पण तिसऱ्या वर्षीच 'लुकेंसिस' ह्या रोगाची बाधा झाली. त्यास संघाच्या सतरा हजार कोंबड्या मरण पावल्या. त्यामुळे संघाचे दोन लाख, पंचवीस हजाराचे नुकसान झाले. पण तात्यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी धीर सोडला नाही. कोंबडी सहकारी संघाची योजना, अधिक चांगल्याप्रकारे चालवावयाची असा निश्चय केला आणि त्या प्रयत्नांना यशही येवू लागले. "प्रयत्नाच्या घरी । ऋद्धी सिद्धी पाणी भरी । हे खरेच आहे. 'वाचविणे म्हणजे मिळविणे' ही पहिल्या पासून आम्ही भूमिका ठेवली."[१] एकूणच संकट येत असतात पण त्या संकटांना तोंड देवून व्यवसाय यशस्वी करावयाचे असतात.

महाराष्ट्रात इतरत्र कोंबडी पालन व्यवसाय ८०% अयशस्वी झाला. पण वारणानगरमध्ये मात्र तो यशस्वी झाला. त्याचे कारण म्हणजे कोंबडी संघाला कोणत्या गोष्टींची कमतरता आहे व त्या वेळच्यावेळेला पुरवणे हे सर्वात महत्त्वाचे असते. हे काम तात्यासाहेबांच्या नेतृत्वाखाली गणेश बापूजी जोशी व तात्यांचे बंधू नानासाहेब कोरे करत होते. म्हणून हा व्यवसाय यशस्वी झाला. वारणेमध्ये प्रत्येक व्यवसाय यशस्वी होण्याचे कारण म्हणजे तात्यांच्या बरोबरीने काम करणारी मंडळी. उदा. कारखाना म्हटले की तात्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे घोरपडे आण्णा, दूध संघात नानासाहेब, कोंबडी संघात जोशी, संवर्धक मंडळात गुळवणी मामा इ. कार्यकर्त्यांची फळी तात्यांना मिळाली म्हणून तात्यांनी जो-जो व्यवसाय केला, उद्योग उभारला तो यशस्वी झाला. तात्यांच्या बरोबरीने ह्या मंडळीचे कामही इतकचे महत्त्वाचे आहेत. अशा पद्धतीने कोंबडी संघ हा अडचणीतून बाहेर काढला.

वारणा परिसरात कोंबडी पालनाची आवड लोकांत निर्माण करण्याचे काम ह्या संघाने केले. जिराईत शेतकरी, शेतमजूर यांना हा उद्योग आवश्यक आहे, हे पटवून देण्यात हा संघ यशस्वी झाला आहे. "म्हणूनच तात्यासाहेब सांगतात की प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या घरी कमीत कमी दोन दूधाची जनावरे तसेच ५० कोंबड्या पाळणे गरजेचे आहे. तरच शेतकऱ्यांच्या घरी सुखाची चूल पेटेल."[४] असे तात्यासाहेबांनी शेतकऱ्यांना अहवान केले. याशिवाय साखर कारखान्याचे काही सभासद आणि कर्मचारी एकत्र येऊन 'सह्याद्री कुक्कट पालन संस्था, वारणानगर' मध्ये १८ जुलै १९६८ पासून कार्यरत आहे. त्या संस्थेचेही कामकाज यशस्वीपणे चालू आहे. वारणा कोंबडी संघ आमच्या अमृतनगरजवळ तर सह्याद्री कुक्कुट पालन संस्था वारणा कारखान्याच्या पाठीमागे पोखले रस्त्याला लागून आहे. शिवाय १९८७-८८ मध्ये 'विश्वनाथ कुक्कुट पालन सहकारी संस्था', अमृतनगर येथे स्थापन केली आहे. म्हणजे कोंबडी पालन हा व्यवसाय अनिश्चित स्वरूपाचा आहे. पण वारणानगर येथे तो यशस्वी झाला आहे. आज वारणानगरमध्ये तीन्ही कोंबडी संघ यशस्वीपणे कार्य करीत आहेत.

कोल्हापूर आणि सांगली जिल्हा हे कार्यक्षेत्र असलेली महाराष्ट्रातील एक अग्रेसर पोल्ट्री संस्था म्हणजे श्री वारणा कोंबडी सहकारी संघ. ह्या संस्थेच्या शेअरची किंमत रूपये दोन हजार आहे. पण दरसाल शेअरहोल्डरला किमान १२०० ते १५०० रूपयांपर्यंत नफा दिला जातो. प्रत्येक सभासदाला दररोज १० अंडी मोफत दिली जातात. असे कागदोपत्री दाखवून त्या अंड्यांची रक्कम सभासदाच्या खात्यावर जमा केली जाते. ही एक वैशिष्ट्यपूर्ण तरतूद आहे. पोल्ट्री व्यवसाय यशस्वी होतो आहे. हे लक्षात आल्यावर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील लोकांनी शेतीला जोडधंदा म्हणून सुरू केला. बागायत तसेच जिराईत शेतकरी, भूमीहिन लोकांनाही तो फायद्याचा आहे, त्याचा परिणाम वारणा परिसरात ४०० पोल्ट्री फार्म्स सुरू झाले आहेत. प्रत्येक पोल्ट्री मालकाने

आपल्या कुवतीप्रमाणे कोंबड्या पाळल्या आहेत. त्यामध्ये १०० पासून ते ३००० हजारापर्यंत आहेत. ह्या कोंबड्यांना लागणारे खाद्य वारणा कोंबडी संघातर्फे 'वाकोस' नावाचे कोंबडी खाद्य उत्पादन करून ते खाद्य तसेच औषधांची विक्री संघामार्फत सभासदांना 'ना नफा-ना तोटा' या तत्त्वावर सुरू केली आहे. त्यामुळे या व्यवसायाची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कोंबडी पिल्ले सभासदांना पुरविण्याचे कामही वारणा कोंबडी संघ करत आहे.

या कोंबडी संघामार्फत कोंबडीचे खत वारणा कारखान्याच्या मालकीची असणाऱ्या जमिनीत घातले जाते. त्यामुळे तेथील ऊस, झाडे यापासून उत्पन्न चांगले येते. तसेच शेतकऱ्यांनाही ह्या व्यवसायापासून कंपोस्ट खत मिळते. पर्यायाने शेतीला ते किफायतशीर ठरते. हा व्यवसाय शेतीला पुरक आणि फायद्याचा आहे, हे आता वारणा परिसरात कळू लागले आहे. त्यामुळे या व्यवसायात वाढ होत आहे. तसेच वारणेच्या वरील तिनही संस्था शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. कोंबड्या जास्त उत्पन्न देणाऱ्या पुरवण्याचे काम ह्या संघामार्फत केले जाते. तसेच खाद्य आणि औषध पुरविण्याचे काम संघ करतो. म्हणून तात्यासाहेबांच्या नेतृत्त्वाखाली कोंबडी संघ यशस्वी झाला. तसेच शेतकऱ्यात ही मोठ्या प्रमाणात व्यवसाय करण्यास सुरूवात झाली. त्यांचा परिणाम वारणा परिसरातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत वाढ होण्यात झाला आहे. आज ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तनाचे,आर्थिक प्रगतीचे भाग्यमळे फुलत आहेत, डोलत आहेत, ग्रामीण जनतेचे दारिद्र्य काहीसे कमी होण्यास वारणा कोंबडी संघामार्फत मदत झाली आहे.

**कोंबडी संघाबाबत तात्यासाहेब यांचे संकल्प :-**

वारणा सहकारी कुक्कुट पालनाचा व्यवसाय करू लागले. त्यांचा परिणाम पुढे भविष्यकाळात अंड्यांचे प्रमाण वाढणार आणि हा माल लवकरात लवकर

SHIVAJI UNIV... LIBRARY KOLHAPUR

खपण्यासाठी तात्यांच्या काही योजना आहेत. त्या पुढील प्रमाणे "मुंबईसारख्या ठिकाणी, शहरात घरपोच अंड्याचा रतीब सुरू करायचा. तीन, सहा, बारा अशी अंडी प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून, ती घरपोच करायची तसेच अंड्यापासून पावडर तयार करून ठेवली तर आम्लेट करण्यासाठी पावडरचा वापर करता येईल."[५] वरील प्रमाणे तात्यासाहेबांच्या योजना होत्या. पण तात्यासाहेबांच्या हयातीत त्या साक्षात आल्या नाहीत. पुढील काळात तात्याचे वारस म्हणून वारणेच्या क्षितीजावर काम करणारे विनय कोरे हे कितपत यशस्वी होतील, हे पुढील काळात कळेल. अर्थात त्यांनी अनेक तात्यांचे संकल्प पूर्ण केले आहेत.

**श्री वारणा सहकारी बँक :-**

१९६५-६६ च्या काळात शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक होती. कारण शेतीला पाणीपुरवठा नव्हता. तरीसुद्धा वारणेच्या उजाड माळावर साखर कारखाना स्थापन झाला, पण येथील शेतकरी फारसा सुधारला नाही. तेथील शेतकऱ्याची पत नसल्यमुळे म्हणजेच शेतीच्या पिकाची हमी नसल्यामुळे शेतकरी आहे त्या परिस्थितीतच जीवन जगत होता. यातून बाहेर काढण्यासाठी आपण ह्या परिसरात 'पतीचा' फारसा विचार न करता भांडवल पुरवावे असे तात्यांना वाटू लागले. म्हणूनच त्यांच्या मनात वारणा सहकारी बँक काढण्याचा विचार आला. शेतकऱ्यांना आपण भांडवल पुरविले म्हणजे त्यांच्या शेतीचा विकास होईल व वारणा साखर कारखान्याला ऊसाचा मुबलक पुरवठा होईल या विचाराने १९६६ मध्ये तात्यासाहेबांनी को-ऑपरेटिव्ह खात्याचे कमिशनर माननीय सुब्रमण्यम यांची भेट घेतली आणि वारणा परिसरात बँक काढण्याचा विचार त्यांनी व्यक्त केला. त्यावेळी ते म्हणाले, "ही सहकारी बँक केवळ अर्बन बँकेच्या स्वरूपाची असू नये. ही बँक ज्या वारणा परिसरात स्थापन होणार त्या परिसरातील, त्या कार्यक्षेत्रातील जो मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यास साहाय्य करणारी व

शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्था निर्माण होतील. त्यांना पैसे पुरवणारी अशी बँक आम्हाला हवी आहे. म्हणजे कृषि उद्योग सहकारी बँक आम्हाला हवी आहे.''[६] वारणा परिसरात बँक स्थापन करून 'कृषि-औद्योगिक समाज' निर्माण करण्याचे मा. यशवंतरावजी चव्हाण यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी तात्यासाहेब प्रयत्नशिल होते. यशवंतराव चव्हाण यांनी तात्यांना अनेक उपदेश दिले, सल्ले दिले, त्यांच्या विचारातून तात्यासाहेब वारणेमध्ये प्रत्येक गोष्ट करीत असत. पण हे काम करीत असताना तेथील परिसराचा अभ्यास तात्यासाहेब करून मगच निर्णय घेत असत.

''तात्यासाहेब ज्यावेळी वारणानगर येथे बँक काढण्याचा विचार करत होते तेंव्हाच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने एक वेगळे धोरण जाहीर केले की ज्या लहान बँका, खाजगी किंवा सहकारी क्षेत्रात काम करीत असतील त्यांनी २८ फेब्रुवारी १९६६ च्या आंत एक लाख रूपयांचे भाग भांडवल जर जमा केले तरच त्यांना रिझर्व्ह बँकेकडून मान्यता मिळेल.''[७] केवळ पाच दिवस शिल्लक असताना हा आदेश आल्यानंतर तात्यांनी कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील फक्त कोल्हापूर जिल्ह्यातील दौरा केला. बँक कोल्हापूर जिल्ह्यात असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील गावांचाच समावेश करण्यात आला. प्रत्येक भागाची शेअरची किंमत रूपये १०० रूपये होती. केवळ तीन दिवसांत एक लाख त्रेचाळीस हजार रूपये एवढे भागभांडवल जमा केले. आणि तारखेच्या आंत बँकेचे प्रपोजल देण्यात आले. या गडबडीत अर्बन बँकेचीची घटना स्वीकारावी लागली. सुरवातीस सभासद संख्या सातशे पन्नास इतकी होती. अशा पद्धतीने श्री वारणा सहकारी बँक २८ फेब्रुवारी १९६६ ला स्थापन झाली.

**खेड्यातील-वारणा बँक :-**

खेड्यात प्रथम पाहून शहरात शाखा उघडण्याचा पराक्रम करणारी राकट भूमीतील प्राथमिक बँक कोणती ? असा प्रश्न कोणी विचारल्यास त्याला उत्तर द्यावे

लागते, श्री वारणा सहकारी बँक, वारणानगर ! "बँकेची घटना 'कृषि औद्योगिक' दृष्टीकोनातून सर्वस्वी तयार करता आली नव्हती. पण पुढे बँकेने जे कामकाज केले, जी पावले उचलली, जी वाटचाल केली त्यात कृषी औद्योगिक समाज रचनेला हातभार लावणाऱ्या योजना अंमलात आणण्यात आल्या, त्याची कार्यवाही करण्यात आली, एवढे अभिमानपूर्वक सांगू इच्छितो."[८] वारणा सहकारी बँक स्थापन झाल्याने वारणा परिसरातील शेतकऱ्यांची अडचण दूर होऊ लागली बँक यशस्वीपणे कार्य करू लागली. त्यानंतर बँकेने आपला विस्तार करण्यास सुरूवात केली. १५ ऑगस्ट १९७१ ला हातकणंगले तालुक्यातील किणी या गावी वारणा बँकेची पहिली शाखा स्थापन केली. तसेच वारणा बँकेची दुसरी शाखा कोल्हापूर शहरात लक्ष्मीपुरी येथे २६ ऑगस्ट १९७३ ला स्थापन केली आणि एक नवा इतिहास घडविला. कारण सामान्यपणे बँकेचे मुख्य ऑफिस शहरात असते आणि तिच्या शाखा खेडोपाडी निघतात. पण बँक प्रथम खेड्यात स्थापन व्हावी, आणि तिच्या शाखा शहरात निघाव्यात ही गोष्ट वारणा परिसराला अभिमानाची आहे. एका अर्थाने खेड्यातील बँकेने शहरावर केलेली ही स्वारी आहे. त्यानंतर वारणा बँकेने आपले कार्यक्षेत्र वाढविले. संपूर्ण कोल्हापूर जिल्हा आणि सांगली जिल्ह्यातील वारणा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावांचा समावेश करण्यात आला. ज्या पद्धतीने कारखान्याचे कार्यक्षेत्र वाढत आहे त्याच पद्धतीने बँकेचेही कार्यक्षेत्र वाढत आहे. ग्रामीण विभागातील एक अग्रेसर बँक म्हणून वारणा बँकेचा उल्लेख केला जातो.

तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली स्थापन झालेल्या प्रत्येक संस्थेने आपले कार्य यशस्वी केले आहे. आणि वारणा परिसरातील खेड्यांचा विकास केला आहे. ज्या पद्धतीने वारणा कारखान्याच्या माध्यमातून हरितक्रांती, दूध संघाच्या माध्यमातून श्वेत क्रांती आणि वारणा बँकेच्या माध्यमातून आर्थिक क्रांती झाली आहे.

वारणा बँकेने कर्जपुरवठा करण्यासाठी दुर्बल घटकांचाच विचार प्राधान्याने केला आहे. शेतकरी हा केंद्रबिंदू मानून बँकेने कार्य केले आहे. शेतकऱ्यांसाठी शेतीविकास खते, बियाणे, विहिर खुदाई व दुरूस्ती, पाईप लाईन आणि इरिगेशन, इलेक्ट्रीक मोटर्स, गाई व म्हैशी खरेदी, ट्रॅक्टर्स, ऊस वाहतूक इत्यादीसाठी मोठ्या प्रमाणात कर्ज दिले जाते. तसेच छोटे-छोटे व्यवसाय करणाऱ्यांसाठी बँकेने कर्जपुरवठा करून सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताने काम दिले आहे. उदा. रिक्षा, ट्रक खरेदी, कुक्कुटपालन करण्यासाठी कर्ज दिले आहे. गरीब होतकरू आणि गरज असणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय आणि इंजिनिअरिंग शिक्षणासाठी विना व्याज कर्जपुरवठा केला. याचा लाभ बऱ्याच विद्यार्थ्यांना झाला. त्यामुळे वारणा परिसरात छोटे-छोटे व्यवसाय उभे राहिले, तसेच अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून अलिप्त राहणे बंद झाले. तसेच वारणा बँकेचे कार्यक्षेत्र कोल्हापूर जिल्हा आणि सांगली जिल्ह्यातील कारखाना परिसरातील असल्यामुळे जवळ-जवळ ३०० लोकांना प्रत्यक्षपणे नोकरी मिळाली. तसेच बँकेमुळे लोकांना अप्रत्यक्ष काम मिळाले आहे.

**वारणा बँकेच्या योजना :-**

तात्यासाहेब कोरे यांच्या कल्पकतेतून वारणा बँकेच्या आगळ्या-वेगळ्या योजना निर्माण करून एक आदर्श बँकिंग व्यवहारात घातला आहे. उदा. 'बालक कल्याण योजना', 'वारणा बँकेची लक्ष्मीपूजन योजना', 'लहान रक्कम, लाभ भक्कम', 'वारणा बँकेची निवृत्ती ठेव योजना', 'गृहलक्ष्मी ठेव योजना' निर्माण केल्या आहेत. या योजनेद्वारा वारणा परिसरातील लोकांच्यामध्ये बचतीची सवय लागावी म्हणून या योजना निर्माण केल्या आहेत. वरील योजनेत लोकांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून या योजनेला चांगले सहकार्य केले आहे. त्याचा फायदा लोकांना झाला. शेतकरी, छोटे व्यावसायीक, नोकरदार या सर्वांसाठी ही बँक चांगली आहे. तसेच श्री वारणा सहकारी

बँकेने आपल्या कार्याच्या जोरावर अल्पावधीतच ग्रामीण जनतेच्या आणि शहरी जनतेच्या विश्वासाला पात्र राहून नेत्रदीपक प्रगती केली आहे. त्यामुळे शहरात ग्रामीण भागात कार्य करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची बँक म्हणून ह्या बँकेने भरीव कार्य केले आहे. तसेच तिचा विस्तार केला आहे. वारणा बँकेने आपला दर्जा निर्माण केला आहे. तसेच बँकेच्या शाखा आणि सभासदही वाढविले आहेत.

वारणा बँकेने आपल्या कार्याबद्दल 'योजना' या पाक्षिकाने असे म्हटले आहे, "वारणा बँक म्हणजे सामान्य माणसाच्या मालकीची सहकारी बँक. भारताच्या नियोजन मंडळाच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या 'योजना' पाक्षिकाने वारणा बँक म्हणजे 'छोट्या लोकांची मोठी बँक' असा सार्थ गौरव केला आहे."[१] श्री वारणा सहकारी बँकेची प्रगती ही चौफेर झाली आहे. सुरूवातीची दोन वर्षे वगळता ह्या बँकेने 'अ' वर्ग ऑडिट झाले आहे. बँकेच्या एकूण ३५ वर्षाच्या कालावधीत अनेक सुविधा सामान्य लोकांना पुरविल्या आहेत. त्यामुळे लोकांचा (सभासदांचा) वारणा बँकेवर शंभर टक्के विश्वास आहे. सभासदांनी सुद्धा कर्जपुरवठा केलेला पैसा वेळेवर परत केला आहे. बँकेची वसुलीसुद्धा वेळेवर पूर्ण होत आहे.

कोणत्याही सहकारी संस्था म्हटले की, निवडणूकीला महत्त्वाचे स्थान असते. पण तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली वारणा बँकेच्या पंचवार्षिक निवडणूका बऱ्याच अंशी बिनविरोध झाल्या आहेत. तसेच काहीवेळा निवडणूका झाल्या; त्या सुद्धा फारशा वादळी न होता शांततेने पार पडल्या आहेत. तात्यांच्या व त्यांच्या सहकार्यावर बँकेच्या सभासदांनी पूर्ण विश्वास व्यक्त केला आहे. आज तात्यांच्या पाश्चात आमदार विनय कोरे (सावकर) यांच्या नेतृत्त्वाखाली बँक प्रगतीपथावर आहे. माननीय निपुन कोरे हे बँकेचे विद्यमान चेअरमन आहेत. ते शांतवृत्तीचे असल्यामुळे तात्यासाहेब कोरे यांनी

ARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

आखून दिलेल्या ध्येयधोरणानुसार वाटचाल करीत आहेत. आज बँक स्थापन होऊन ३५ वर्षे होऊन गेली आहेत. या काळात कोल्हापूर जिल्हा व सांगली जिल्ह्यातील वारणा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात २१ शाखा आणि एक एक्स्टेंशन कौंटर आहे. या सर्व बँका ग्रामीण तसेच शहरी विभागातही काढल्या आहेत. त्या शाखा पुढील प्रमाणे : वारणा नगर (प्रधान कार्यालय) तसेच एक्स्टेंशन किणी, लक्ष्मीपुरी कोल्हापूर, हेरले, एम. आय. डी. सी. शिरोली, इचलकरंजी, भवानी मंडप कोल्हापूर, पेठवडगांव, जयसिंगपूर, शिरोली पुलाची, बागल चौक, कोल्हापूर, कोडोली, पारगांव, ऐतवडे-खुर्द, खोची, शिंगाव, सातवे, चिकुर्डे, कळे वाशी (नवी मुंबई), मांगले अशा एकूण २१ शाखांच्याद्वारे काम करत आहे. तसेच मार्केड यार्ड, सांगली आणि शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर येथे वारणा बँकेच्या लवकरच शाखा चालू होणार आहेत. अशाप्रकारे ग्रामीण आणि शहरी जनतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वारणा बँक 'मनूच्या माशा' सारखी वाढत आहे. वरील शाखांपैकी वारणानगर येथील प्रधान कार्यालयाची इमारतीचे १९८६ मध्ये त्यावेळेचे राजस्थानचे राज्यपाल व वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे हितचिंतक माननीय वसंतदादा पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. तसेच इतर ६ शाखा स्वत:च्या मालकीच्या जागेत आहेत.

**बँकेच्या प्रगतीचा आढावा :-**

२८ फेब्रुवारी १९६६ ला बँक स्थापन झाली. त्यानंतर सन २००० अखेर सभासद संख्या कशा पद्धतीने वाढ झाली, याचा अभ्यास करण्यासाठी दर पाच वर्षांनी सभासद संख्येत कशी वाढ झाली त्याचा तक्ता दर्शविला आहे. तो पुढीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | सन | सभासद संख्या 'अ' वर्ग |
|---|---|---|
| १. | ३०/६/१९६६ | ८५९ |
| २. | ३०/६/१९७१ | १२५० |
| ३. | ३०/६/१९७६ | १४१६ |
| ४. | ३०/६/१९८१ | २४७४ |
| ५. | ३०/६/१९८६ | ५९३५ |
| ६. | ३१/३/९१ | १०९४४ |
| ७. | ३१/३/९६ | १४६२५ |
| ८. | ३१/३/२००० | १४८६४ |

१०

अशा पद्धतीने श्री वारणा सहकारी बँक 'अ' वर्ग सभासदांच्या संख्येत वाढ झाली, अभ्यासासाठी पाच वर्षातील फरकाने सभासद संख्येतील बदल आहेत. १४८६४ इतकी सभासद संख्या आहे. २००१ सालची आकडेवारी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे संशोधनासाठी ३१/३/२००० पर्यंतची सभासद संख्या घेतली आहे. आज त्यामध्ये कांही बदल झालेले अपेक्षित आहेत.

"३१/३/२००० रोजी बँकेचे स्वत:चे भांग भांडवल २ कोटी १० लाख २३ हजार इतके आहे. तर ठेवी ९४ कोटी ५३ लाख ५२ हजार इतकी आहे, तर निव्वळ नफा ६० लाख ७६ हजार इतका आहे."[११]

अशा पद्धतीने औद्योगिक समाज निर्मितीसाठी धडपडण्याचे ध्येय बाळगणारी बँक तात्यासाहेब कोरे यांनी स्थापन केली. सुरूवातीच्या काळात अर्बन बँकेची घटना स्वीकारणारी नंतर कृषि औद्योगिक बँक झाली. बँकेने ग्रामीण-शहरी विभागात मोठ्या प्रमाणात काम केले आहे. ही बँक लोकांच्या विश्वासास पात्र ठरली आहे. हे वरील आकडेवारीवरून सहज लक्षात येते. तात्यांचे आदर्श पुढील पिढी पाळत

आहे हे सुद्धा वारणा बँकेचे, परिसराचे भाग्यच म्हणावे लागेल. तात्यांनी घालून दिलेला आदर्श पुढे चालविण्याचे काम विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली संचालक मंडळ करीत आहे. बँकेची प्रगती दिवसें-दिवस वाढतच आहे. ज्या उद्देशाने बँक स्थापन केली तो उद्देश पूर्णपणे यशस्वी झाला असे ३५ वर्षानंतर म्हणावे लागले.

**वारणा बझार :-**

वारणा म्हणजे विकास हे जसे समीकरण जमले आहे, त्याप्रमाणे वारणा बझार म्हणजे, नवनवे विक्रम असेही समीकरण जुळले आहे. आज २४ वर्षे झाली, वारणा बझार ग्राहकांना सेवा पुरवित आहे. ग्राहकांच्या मनात अढळ विश्वास आणि काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत कीर्ती प्राप्त केली आहे. वारणा बझार हे भारतातील ग्रामीण भागातले पहिले सहकारी डिपार्टमेंटल स्टोअर्स आहे. या सुसज्ज सकल वस्तु भांडाराने सहकारी, व्यापार क्षेत्रातील अनेक विक्रम मोडले आहेत. सहकार चळवळीमध्ये ग्राहक चळवळीला फार मोठे स्थान आहे, कारण जागतिक सहकारी चळवळीचा आमचा ग्राहक चळवळीद्वारे झाला. पण आपल्या देशात सहकारी ग्राहक चळवळ अपेक्षेएवढी रूजली नव्हती. तात्यासाहेब हे प्रामुख्याने सहकार चळवळीत काम करणारे नेतृत्त्व होते. त्यांनी सहकारी चळवळीचा सखोल अभ्यास केला, तेव्हा त्यांनी आपणही वारणानगरमध्ये सहकारी ग्राहक भांडाराची योजना हाती घ्यावी, असा विचार करत होते. ह्या ग्राहक भांडाराद्वारे ग्रामीण जनतेच्या जीवनावश्यक आणि शेती व इतर पूरक व्यवसायांच्या गरजा भागविणे; हे प्रमुख उद्दिष्ट होते. तसेच वारणा परिसरातील लोकांचा पैसा येथेच रहावा याही उद्देशाने ७ ऑगस्ट १९७६ मध्ये वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळाची स्थापना केली. या मंडळाच्या सकल आणि सुसज्ज वस्तु भांडाराचे उद्घाटन २ एप्रिल १९७८ ला मा. ना. मोहन धारिया त्यावेळचे केंद्रीय व्यापार, पुरवठा आणि सहकार मंत्री यांच्या शुभहस्ते व वारणा विविध उद्योग व शिक्षण मंडळाचे हितचिंतक मा. ना. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

वारणा बझार हे आपल्या देशातील, ग्रामीण भागातले पहिले सहकारी सकल वस्तु भांडार असून त्याची उभारणी नॅशनल को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर्स फेडरेशन लि. नवी दिल्ली, या संस्थेच्या तज्ञांकडून झाली आहे. आजपर्यंत सहकारी सकल वस्तु भांडारे फक्त शहरापुरतीच मर्यादित होती. त्यामुळे वारणेसारख्या ग्रामीण परिसरात वारणा बझार चालविणे हे एक आव्हान होते. पण कोणतेही आव्हान पेलणं हे तात्यांच्या अंगवळणी पडले होते. तसेच वारणेच्या प्रत्येक उद्योगाला वारणा साखर कारखाना ही एक मोठी ताकद आहे. ह्या कारखान्याने वारणा बझारसाठी मोठी मदत केली. सुरूवातीपासून प्रत्येक अडचणीच्यावेळी वारणा कारखान्याने मदतीचा हात दिला. म्हणूनच वारणा बझार तसेच इतर उद्योगही प्रगतीपथावर आहेत. कारखान्याने वारणा बझारसाठी, भव्य आणि अत्याधुनिक अशी वास्तु बांधून ती सवलतीच्या भाड्याने दिली आहे. तसेच केंद्र आणि राज्य सरकारकडून कर्ज आणि सबसिडी मिळाली. या कर्ज आणि सबसिडी रूपाने मिळालेल्या पैशातून फर्निचर, गोडाऊन, व्यवस्थापकीय खर्च यासाठी सुरूवातीच्या काळात मोठी मदत झाली. या सर्वांच्या मदतीनेच आज वारणा बझारची घोडदौड चालू आहे. वारणा बझारचे नांव संपूर्ण देशभर गाजले जात आहे.

**वारणा बझारचे ग्रामीण क्षेत्रातील कार्य :-**

आज भारतात अनेक सहकारी ग्राहक भांडार स्थापन झाले आहे. पण या भांडारातून तीन ते चार टक्के ग्राहक देखील खरेदी करत नाहीत असे वेळोवेळी नमूद केले आहे. त्या पार्श्वभूमीवर वारणा बझारने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याचे मुख्य करण म्हणजे ग्रामीण विभागातील ग्राहकांना कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे याचा प्रथम अंदाज घेतला जातो. आणि त्यानुसार आवश्यक असणाऱ्या वस्तु प्रामुख्याने ठेवण्यात येतात. यामध्ये बैलगाडीला लागणाऱ्या दोरी, ट्रॅक्टर्सना लागणारे टायर-ट्यूब्ज, काही स्पेअर पार्टस, शेतीस पाणी पाजण्यासाठी पंप सेटस्, कीटकनाशके, बि-बियाणे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विविध प्रकारची स्टेशनरी, सौंदर्य प्रसाधने, कपडे, शालेय उपयोगी वस्तु तसेच प्रापंचीक वस्तु इ. वारणा बझारमध्ये उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ज्या वस्तु बझारमध्ये ठेवता येत नाहीत अशा वस्तुंची विक्रीही केली जाते. उदा. मंगलोरी कौले, सिमेंट पत्र, ॲसबेसटॉस सिमेंट लि. या कंपनीचे सिमेंट पत्रा वितरणाचे महाराष्ट्रातील पहिले ग्रामणी वितरण केंद्र ठरले आहे. दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या गोष्टी वारणा बझार मध्ये सहज उपलब्ध होतात. वारणा बझारची मांडणी आवश्यक, आकर्षक आणि सहज लक्षात येण्यासारखी आहे. वारणा बझारचा ग्राहक हा प्रामुख्याने ग्रामीण भागातील तसेच शेतकरी वर्ग असल्यामुळे त्यांना कोणत्या गोष्टी पाहिजे हे सहज लक्षात येण्यासारखी मांडणी केली आहे.

"आज अनेक बझार आहेत. पण वारणा बझारच जास्त प्रमाणात यशस्वी होण्याचे कारण म्हणजे, उत्पादकांकडून थेट माल खरेदी करून, ग्राहकांना तो कमीत-कमी दरात उपलब्ध करून देणे, हे वारणा बझारचे ध्येय आहे. ज्या ठिकाणी थेट उत्पादकांकडून माल मिळू शकत नाही, अशावेळी तो त्यांच्या अधिकृत स्टॉकिस्टकडून खरेदी करण्यात येतो. थेट उत्पादकांकडून माल खरेदी केल्यामुळे वस्तुमध्ये भेसळ नसले, त्यामुळे ग्राहकाचा विश्वास संपादन करून शकलो, ग्राहक आमचा केंद्रबिंदू मानून कार्य करत आहे."[१२] स्वयंसेवा विभाग हे वारणा बझारचे खास आकर्षण १९८० च्या दरम्यान ठरले, शहरी विभागात स्वयंसेवा योजना होत्या, पण ग्रामीण भागात वारणा बझारने स्वयंसेवा सुरू केल्याने ग्राहकाला स्वत: हाताळून माल पाहण्याची संधी मिळाली. निवडून, स्वच्छ, आकर्षक अशा प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये पॅक करून वस्तु ठेवल्यामुळे त्याची विक्री मोठ्या प्रमाणात झाली. तसेच विक्री मोठ्या प्रमाणात होण्यासाठी रोखीच्या खरेदीवर दोन टक्के बोनस स्टॅपस देण्याची योजना वारणा बझारने सुरू केली. ही योजना सर्व ग्राहकांमध्ये लोकप्रिय झाली. संस्थेच्या सभासदांनी वर्षभर खरेदी मालावर रिबेट दिले

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

जाते. अशा प्रकारे आपला नफा ग्राहकांपर्यंत पोहोचविणे काम ही संस्था करत आहे. तसेच सभासदांना वर्षाकाठी २५ टक्के डिव्हिडंट इतकी सवलत दिली जाते. त्यासाठी चैत्रपाडवा व दिवाळी या सणाच्या वेळी साखर, तुप, गोडेतेल, मैदा, बेसनपीठ इत्यादी वस्तु सवलतीच्या दरांनी पुरविल्या जातात.

गेल्या २४ वर्षाच्या काळात वारणा बझारने नेत्रदिपक प्रगती केली आहे. त्यामुळे बझारवर ग्राहकांचा पूर्ण विश्वास बसला आहे. तसेच सभासदांचाही पूर्ण विश्वास संचालक मंडळावर आहे. वारणा बझारच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सर्व निवडणूका बिनविरोध झाल्या आहेत. सहकार चळवळीत राजकारण मोठ्या प्रमाणात असते. पण वारणा बझारच्या बाबतीत मात्र संचालक मंडळावर सभासदांनी पूर्ण विश्वास व्यक्त केला आहे. तात्यांच्या पाश्चातही वारणा बझारच्या निवडणूका मा. विनय कोरे (सावकर) यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध झाल्या आहेत. सध्या शोभाताई विलासराव कोरे, ह्या संस्थेच्या अध्यक्षा आहेत. एकूण १७ संचालकांपैकी ९ महिला संचालिका आहेत. ही एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. महिला विकासासाठी कार्यरत असणारे सर्व समावेशक नेतृत्व म्हणून 'शोभाताईंचा' उल्लेख केला जातो. त्यांच्या नेतृत्वाखाली वारणा बझारने अनेक विक्रम स्थापन केले आहेत. ज्या पद्धतीने संचालक मंडळावर महिलांचे वर्चस्व आहे. तसेच सभासदांमध्ये सुद्धा महिलांचे प्रमाणे ७७% इतके आहे. एकूण सभासदांपैकी ७७% महिला सभासद असणारी आणि ग्रामीण क्षेत्रात कार्य करणारी एकमेव संस्था आहे.

**सभासद संख्या स्त्री-पुरूष तुलना :-**

वारणा बझार मध्ये स्त्रीयांना प्राधान्य मोठ्या प्रमाणात दिले जाते; हे आपण संचालक मंडळाच्या संख्येवरून पाहिले. त्याच पद्धतीने अभ्यासासाठी सभासद संख्येत कशा पद्धतीने वाढ झाली. हे पाहण्यासाठी सन १९९०-९१ ते १९९९-२००० या

दहा वर्षाचा अभ्यास केला आहे. एकूण सभासदांच्या स्त्री-पुरूष कशी विभागणी झाली आहे ते पुढील प्रमाणे :

| अ. नं. | सन | स्त्री सभासद | पुरूष सभासद | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | १९९०-९१ | ३३६५ | १४९८ | ४८६३ |
| २ | १९९१-९२ | ४३६५ | १६४८ | ६०१३ |
| ३ | १९९२-९३ | ५०२१ | १७३८ | ६७५९ |
| ४ | १९९३-९४ | ५६६७ | १८३३ | ७५०० |
| ५ | १९९४-९५ | ६५७१ | २०८५ | ८६५६ |
| ६ | १९९५-९६ | ७४७३ | २२१० | ९६८३ |
| ७ | १९९६-९७ | ७४७९ | २२१० | ९६८९ |
| ८ | १९९७-९८ | ७४७७ | २२१२ | ९६८९ |
| ९ | १९९८-९९ | ७४८१ | २२१५ | ९६९६ |
| १० | १९९९-२००० | ७५५१ | २२२५ | ९७७६ |


जरी आपण वारणा बझारच्या १९९०-९१ पासून स्त्री-पुरूष सभासद संख्येची तुलना केली असली तरी, वारणा बझारची स्थापना १९७६ साली झाली आहे. सुरूवातीच्या काळात १९७९-८० या वर्षात एकूण सभासद १४७१ एवढे होते. त्यापैकी ११७६ इतके पुरूष तर स्त्रीया सभासद २९५ इतक्या होत्या. म्हणजे सुरूवातीला पुरूषांचेच वर्चस्व या संस्थेवर होते. पण नंतर तात्यासाहेब कोर यांनी वारणा बझारमध्ये

जाणीवपूर्वक स्त्रीयांना प्राधान्य देण्यात आले. वारणा बझारचे सभासद करून घेताना वारणा परिसरातील प्रामुख्याने स्त्रीयांना प्राधान्य देण्यात आले. म्हणूनच स्त्री सभासद संख्या झपाट्याने वाढली, वारणा बझारचे कार्यक्षेत्र कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील १८ गावे, हातकणंगले तालुक्यातील २६ गावे, करवीर तालुक्यातील ५ गांवे तर सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील २३ आणि शिराळा तालुक्यातील ६ अशा एकूण ७८ गावांचा समावेश वारणा बझारच्या कार्यक्षेत्रात होतो. तात्यासाहेबांचा स्त्री सभासद वाढविण्याचा उद्देश उदात्त होता. कारण सहकारी चळवळीत स्त्रीयांचा सहभाग वाढावा, स्त्री सभासद सुद्धा सहकार चळवळ यशस्वी चालवू शकतात; हे दाखवून द्यावयाचे होते. आज एकूण संचालकांपैकी ९ संचालिका महिला आहेत. एकूण सभासद संख्या ९,७७६ इतकी असून त्यापैकी स्त्री सभासद ७५५१ इतक्या म्हणजे ७७% आहेत. या संस्थेची वार्षिक विक्री ४३ कोटी आहे. संपूर्ण संस्थेवर स्त्रीयांचे वर्चस्व आहे. शोभाताई कोरे अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत.

**भाग भांडवलाचा चढता आलेख :-**

वारणा बझारने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे. तरीसुद्धा कोणतीही संस्था उभी असते ती भागभांडवलावर. १९७९-८० या वार्षिक अहवालात एकूण भाग भांडवल ६,४२,१२५ इतके होते. त्यात टप्प्या-टप्प्याने वाढ झाली आहे. १९८५-८६ या वर्षात २१,७६,२५० इतके झाले, अभ्यासासाठी सलग १० वर्षात भागभांडवलात कशी वाढ झाली आहे; याचा आलेख दाखविला आहे. त्यासाठी १९९०-९१ ते १९९९-२००० या दहा वर्षात भागभांडवलामध्ये कशा पद्धतीने वाढ झाली त्याचा आलेख पुढील पानावर दाखविला आहे. भागभांडवलाची आकडेवारी लाखात आहे.

# भाग भांडवल




७०
६०
५०
४०
३०
२०
१०
०
२६.८८
३१.५५
३३.२८
३५.२४
३८.४६
४१.५
५८.८
५७.८१
५२.८५
५६.७१
९०-९१
९१-९२
९२-९३
९३-९४
९४-९५
९५-९६
९६-९७
९७-९८
९८-९९
९९-२०००

### वारणा बझारची विक्रमी विक्री :-

आज वारणा बझारची दोन डिपार्टमेंटल स्टोअर्स वारणानगर आणि वडगांव येथे असून रिरेट आऊटलेट शाखा ३२ आहेत. तसेच महात्मा गांधी मेडिकल आणि कॉलेज याठिकाणी एक्स्टेंशन कौंटर आहे. वारणा बझार ही ग्रामीण भागात कार्यरत असणारी देशातील सर्वांत मोठी संस्था आहे. एकूण ३२ शाखांपैकी पहिली शाखा किणी या ठिकाणी १९८२ मध्ये स्थापन केली. तसेच वारणानगर मध्ये ग्राहक भांडारामार्फत एक पेट्रोल पंप १९९५ पासून सुरू करण्यात आला आहे. या पेट्रोल पंपामुळे वारणा साखर कारखान्याच्या व वारणा परिसरातील वाहानांना लागणारे इंधन पुरवठा होऊ लागला. वारणानगरला आज महाराष्ट्रातील, देशातील तसेच परदेशातील तज्ञ मंडळी भेटी देतात आणि वारणा बझारची प्रगती पाहिल्यावर संबंधीत अधिकारी म्हणतात. "वारणा बझार सारख्या भांडारांना 'वारणा पॅटर्न' आणि छोट्या शाखांना 'किणी पॅटर्न' म्हणू लागले. वारणा बझारचे कार्य आणि सेवा फक्त जनतेकडे रूजू झाली असे नसून सहकारात आणि सहकारी चळवळीत मान्यता पावली असे म्हटले पाहिजे."[१३]

ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या वारणा बझारच्या एकूण १२ शाखाना वार्षिक बजेट दिले जाते. आज वारणा बझारची विक्रमी विक्री चालू आहे. तसेच प्रत्येक वर्षाला त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. "छोट्या शाखेमध्ये कमीत-कमी ४ सेवक दैनंदीन विक्री (सरासरी) २० हजार पर्यंत असते. गडहिंग्लज आणि कोडोली शाखेची वार्षिक विक्री १ कोटींच्या वर आहे. वार्षिक विक्री १९९९-२००० मध्ये ४१.५ कोटी झाली तर २०००-२००१ आर्थिक वर्षात ४३ कोटी विक्रमी विक्री झाली. ग्रामीण विभागातील देशात सहकारी तत्त्वावर चालणारे प्रथम क्रमांकाचे ग्राहक भांडार आहे. आणि एकूण देशात पाचवा क्रमांक आहे."[१४] वारणा बझारच्या विक्रीत कशा पद्धतीने

(किती प्रमाणात) वाढ झाली त्याचा आलेख दाखविला आहे. १९९०-९१ ते १९९९-२००० या दहा वर्षाच्या आलेखावरून स्पष्ट होईल संपूर्ण विक्री कोटीमध्ये आहे. १९७९-८० मध्ये एकूण विक्री १,४७,२७,२३० इतकी होती तर २०००-२००१ मध्ये ४३ कोटी विक्री झाली. दर वर्षाला विक्री किती प्रमाणात वाढते याचा आलेख पुढील पुढील पानावर दर्शविला आहे.



विक्री
४५
४०
३५
३०
२५
२०
१५
१०
५
०
१३.६५
१५.५७
१७.५५
२०.३९
२५.२९
२८.४३
३१.११
३२.८४
३७.६२
४१.५६
९०-९१
९१-९२
९२-९३
९३-९४
९४-९५
९५-९६
९६-९७
९७-९८
९८-९९
९९-२०००

**निव्वळ नफा :-**

कोणत्याही संस्थेची विक्री जेवढ्या प्रमाणात होते त्यातील काही प्रमाणात संस्थेला नफा मिळू शकतो. संस्थेला नफा हा सर्व खर्च वजा करून मिळतो. वारणा बझारने विक्री ज्या प्रमाणात वाढत गेली त्याच प्रमाणात नफा सुद्धा वाढत गेला १९७९-८० या वर्षात विक्री ही १,४७,३७.२३० इतकी झाली तर निव्वळ नफा हा ४०,८.२८ इतका झाला. कोणत्याही संस्थेचा निव्वळ नफा हा त्या संस्थेची प्रगती समजण्यास उपयुक्त ठरू शकतो. त्यासाठी १९९०-९१ ते १९९९-२००० या दहा वर्षात निव्वळ नफा किती झाला हे समजू शकते, त्यासाठी पुढील पानावर आलेख दाखविला आहे. नफा हा लाखामध्ये दाखविला आहे.

## निव्वळ नफा

(रूपये लाखात)



वारणा बझारच्या एकूण ३२ शाखा आहेत, प्रत्येक शाखेच्या गरजेनुसार आवश्यक असणारा नोकर वर्ग आहे. वारणा बझारमुळे प्रत्यक्ष ३७७ लोकांना काम मिळाले. त्यापैकी २४२ पुरूष आहेत तर १३५ स्त्रीया आहेत. नोकरीमध्येही तात्यासाहेब कोरे यांनी महिलांना चांगले स्थान दिले आहे. ग्रामीण विकासात स्त्रीयांचाही सहभाग करून घेतला आहे. देशातील ग्रामीण क्षेत्रात काम करणारा एक आदर्श ग्राहक भांडार म्हणून वारणा बझारचा उल्लेख केला जातो. कोणत्याही सहकारी संस्थेत सुरवातीच्या काळातील जो उद्देश असतो. तो कालांतराने नष्ट होतो, आणि राजकारणाचा आखाडा तयार होतो. पण वारणा बझारमध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण नाही. आत्तापर्यंतच्या सर्व निवडणूका बिनविरोध झाल्या आहेत हा एक आदर्शच आहे. आज वारणा बझारच्या धर्तीवर महाराष्ट्रात अनेक सहकारी ग्राहक भांडार उभे आहे. त्यातील बऱ्याच संस्थांनी वारणा बझारचे अनुकरण केले आहे. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे सांगता येतील, त्यातून ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे. म्हणजे तात्यासाहेब कोरे यांच्या विचाराने केवळ वारणा परिसरातच ग्रामीण विकास झाला असे नसून, त्यांचा आदर्श घेऊन महाराष्ट्रातही ग्रामीण विकास झाला आहे. संपूर्ण कोकणपट्टीत अग्रेसर असणारा 'रायगड बझार' ही संस्था वारणानगरचा आदर्श घेऊन काम करत आहे. त्याशिवाय काही फलटणचा श्रीराम बझार, सांगलीचा 'वसंत बझार', कराडचा 'जनता बझार' असे अनेक ग्राहक भांडार महाराष्ट्रात ठिकठिकाणी जनतेच्या सेवेसाठी उघडले आहेत. या सर्व संस्थांनी वारणा बझारकडून सहकार्य घेतले आहे, आणि वारणा बझारनेही सर्व प्रकारची मदत केली. वारणा बझारने सर्वच क्षेत्रात चौफेर प्रगती केली आहे. वारणा बझारची कोणतीही शाखा पाहिल्यावर काहीतरी खरेदी करावी असे ग्राहकांना वाटते. म्हणूनच मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगरू थोर विचारवंत श्री. शिवाजीराव भोसले म्हणतात "वारणा बझार पाहून कुबेराचे भांडार आठवले, मनात यावे ते समोर दिसावे आणि समोर दिसेल ते घ्यावे असे वाटावे अशी ही स्वप्ननगरी आहे."[१५]

**वारणेच्या महिला संस्था :-**

वारणा परिसरांच्या विकासासाठी तात्यासाहेब कोरे यांनी प्रथम १९५४ साली कारखाना स्थापनेसाठी आपली सर्व शक्ती पणाला लावली; आणि १९५९ साली साखर कारखाना सुरू केला. त्यानंतर वारणानगरमध्ये अनेक संस्था उभ्या राहिल्या. या संस्थांच्या स्थापनेमुळे वारणा परिसरातील ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारले. एकूण समाजात निम्मी शक्ती ही स्त्रियांची आहे, त्यामुळे स्त्रीयांचा सुद्धा सहकारात सहभाग झाला पाहिजे, या विचाराचे तात्यासाहेब होते. सहकारामुळे वारणा परिसरात सुधारणा झाल्या, त्याच पद्धतीने स्त्रीयांनाही घरबसल्या अर्थाजन करता यावे यासाठी तात्यासाहेब यांनी महिलांसाठी विविध उद्योग स्थापन केले. हे उद्योग स्थापन केल्यामुळे वारणानगरमधील विविध उद्योगाचे कामगार वसाहतीतील महिलांना आणि कारखान्याच्या नजीकच्या गावातील महिलांना घरबसल्या फावल्या वेळेत काम करून द्रव्यार्जन करता यावे. या पवित्र उद्शाने वारणा नगरच्या भगिनी मंडळामार्फत मुंबईच्या सुप्रसिद्ध महिला गृहोद्योग पापड केंद्राची शाखा वारणानगर येथे २५ सप्टेंबर १९७४ ला सुरू करण्यात आली. या संस्थेच्या आजपर्यंतच्या सर्व शाखा शहरी भागातच होत्या. विशेषत: मुंबई, पुणे यासारख्या शहरातच होत्या. पण वारणानगरची शाखा ही ग्रामीण भागातील पहिलीच शाखा होती. शहरातल्या महिलांना घरबसल्या काम करून तसेच स्त्रीया फारसे कष्टही न घेता 'पापड' केंद्र ही संस्था स्थापन केली होती. वारणानगरसारख्या ग्रामीण भागात ही शाखा चालू केली होती. त्यामुळे महिला या संस्थेत सहभागी होतील की नाही याची सुरवातीला शंका वाटत होती. पण तात्यांनी कामगार आणि शेतकरी यांना विश्वासात घेऊन अशा संस्था निर्माण होणे गरजेचे आहे हे पटवून सांगितले. त्याचा परिणाम वारणेच्या अनेक संस्थात महिलांचीही संस्था उभी राहिली या महिला संस्था उभारणीसाठी तात्यासाहेब कोरे यांच्या बरोबरीने तात्यांच्या पत्नी सावित्री-आक्का, सून शोभाताई कोरे, याशिवाय अनिता नाईक, सौ. दुर्वे, सौ. दाणी, सौ.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

कुलकर्णी, सौ. केकाल यांनी महिला संस्था स्थापनेसाठी आणि त्या यशस्वी चालविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. मुंबईच्या सुमतिभाई शहा आणि श्री. दत्तीणभाई यांनी सर्व प्रकारचे महिलांना मार्गदर्शन केले. त्यामुळेच महिला संस्था उभ्या राहिल्या त्या पुढीलपप्राणे,

**महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र :-**

या पापड केंद्रामुळे वारणा महिलांच्या जीवनात सहकारी तत्त्वावरील एका गृहोद्योगाला प्रारंभ झाला. "महिलांच्या प्रकृतीला आणि प्रवृत्तीला रूचणारा अर्थोत्पादनाचा स्वावलंबी मार्ग महिलांना लाभला. कारण स्वावलंबनच फक्त व्यक्तीला स्वत:चा बहुमान, आत्मसम्मान मिळवून देऊ शकते. स्वत:च्या श्रमातून धन मिळविण्याच्या अनुभवामुळे, मनातली न्यूनतेची भावना दूर हटते आणि स्वबळाचा आत्मविश्वास वाढू लागतो. 'लिज्जत पापड केंद्र' वारणानगरला स्थापन केले."[१६] या पापड केंद्रात उत्तम प्रतीचे पापड तयार होऊ लागले, पापड लाटण्याच्या कामात वारणा कामगारांच्या महिलांचा मोठा सहभाग होता. कामगार हा गरिबच असतो त्याच्या घरची आर्थिक स्थिती सुधारण्यास ह्या पापड केंद्रामुळे मदत झाली. यापासून फायदा होत आहे. हे लक्षात आल्यानंतर महिलांचा सहभाग वाढला आहे.

आज श्री महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्रामध्ये ५०० हून अधिक भगिनी पापड लाटण्याचे काम करत आहेत. संस्थेचा वाढता व्याप लक्षात घेता पापड लाटणाऱ्या भगिनींना ने-आण करण्याची मोफत सोय या संस्थेने बसद्वारे केलेली आहे. वारणानगर बरोबरच कारखाना कार्यक्षेत्रातील महिलांना अशाप्रकारे अर्थार्जन करता यावे व पापड लाटण्याचा व्यवसाय करण्यासाठी परिसरातील खेडोपाडी हा उपक्रम महिला मंडळामार्फत राबविण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. भगिनी मंडळामार्फत पापड केंद्राबरोबरच पिठाची गिरण, डंग, लोणची तयार करणे, इतर खाद्य पदार्थांचे उत्पादन

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यासारखे अन्य उपक्रमही राबविले आहेत. ह्या पापड केंद्रामुळे महिलांना मोठ्या प्रमाणात कामाचा मोबदला मिळू लागला. त्यामुळे वारणा परिसरातील महिला स्वयंपूर्ण झाल्या आहेत.

**महिला पतसंस्था :-**

वारणेतील महिलांना बँकिंग व्यवहाराची माहिती व्हावी तसेच त्यांना बचतीची सवय लागावी. आणि त्यातूनच त्यांच्या आर्थिक अडचणी दूर व्हाव्यात म्हणून वारणा महिला सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली आहे. "या संस्थेच्या १,७८२ महिलास सभासद आहेत. पतसंस्थेकडे ५ कोटी ७० लाख रूपये खेळते भागभांडवल असून ५ कोटी २१ लाख रूपयांच्या ठेवी आहेत. ३ कोटी ९३ लाख रूपयांची कर्जे वाटप केलेली आहेत."[१७] या संस्थेस वारणा कारखान्याने अल्प भाडे दराने व भाडेपट्ट्याने दिलेल्या जागेवर कारखान्याजवळ स्वत:ची इमारत बांधली आहे. या संस्थेच्या दोन शाखा कार्यक्षेत्रामध्ये सुरू आहेत. या संस्थेच्या कामकाजावर वारणा बझारच्या अध्यक्षा शोभाताई कोरे व सौ. श्रीदेवी चव्हाण यांचे सातत्याने लक्ष आहे. त्यांच्या विचारानेच महिला बँकेची प्रगती सुरू आहे.

वरील संस्थेशिवाय सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्थेच्यावतीने महिलांसाठी लॉन्ड्री विभाग, पिठाची गिरणी, कंटेनर विभाग पॉलिथिन विभाग, सकस आहार विभाग इत्यादी प्रकारचे कामकाज सुरू आहे. या संस्थेची सभासद संख्या १,६३७ इतकी आहे. ह्या संस्थेने अल्पावधीतच मोठी प्रगती केली आहे.

वरील सर्व संस्था तात्यांच्या मार्गदर्शनानुसार चालू झाल्या व वाढल्या. महिलांना घरबसल्या छोटे-छोटे उद्योग करून आपल्या प्रापंचीक व्यवहारात हातभार लावण्यासाठी ह्या संस्थांचा वारणा परिसराला चांगला उपयोग झाला. आज विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली वारणा विविध उद्योगाचा व शिक्षण समूहाचा व्यवहार अतिशय चांगल्या रितीने चालू आहे.

**सारांश :-**

तात्यासाहेबांचे सामाजिक, आर्थिक व इतर क्षेत्रातील कार्य पाहत असताना प्रामुख्याने वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळाने समाजाची बांधिलकी ओळखून शिक्षण क्षेत्रात बालवाड्यांना प्राधान्य दिले. तसेच तात्यासाहेब कोरे आदर्श ग्रंथालय व ग्रंथपालास पुरस्कार देण्याची योजना आखून समाजात वाचनाची आवड निर्माण व्हावी, आपल्या ज्ञानात भर पडावी या उद्देशाने ह्या मंडळाने कामे केली. सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. वारणा परिसरात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे केवळ शेतीवर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणार नाही; म्हणून शेतीला जोड-धंदा म्हणून इतरत्र अयशस्वी होणारा कुक्कुटपालन वारणानगरमध्ये यशस्वी झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी सुद्धा हा व्यवसाय सुरू करून केवळ शेतीवर अवलंबून न राहता शेतीला जोडधंदा म्हणून तात्यासाहेबांच्या प्रयत्नामुळे वारणा परिसरात यशस्वी झाला आहे.

शेतकऱ्यांची 'पत' सुधारण्यासाठी व दारिद्रय नष्ट करण्याच्या हेतूने वारणा बँक स्थापन केली आणि आज छोटे-छोटे उद्योग सुरू होऊन आपले दारिद्रय नष्ट करण्याचा प्रयत्न या बँकेमुळे यशस्वी झाला. ग्रामीण भाग सुजलाम-सुफलाम करण्याच्या कामी ह्या बँकेने प्रयत्न केला. तसेच ग्रामीण क्षेत्रात ग्राहक भांडार यशस्वी करून त्यांची वार्षिक विक्री ४३ कोटींच्या वर जाऊन वारणेचे नांव संपूर्ण देशभर गाजू लागले. ग्रामीण क्षेत्रात एवढी मोठी उलाढाल करणारी एकमेव संस्था 'वारणा बझार' होय. तसेच अनेक महिला संस्था उभ्या करून महिलांना स्वयंपूर्ण करण्यात तात्यासाहेब यशस्वी झाले आहेत.

याशिवाय तात्यांनी अनेक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनेक संस्था उभ्या केल्या पण संशोधनासाठी वरील संस्थांचाच अभ्यास केला आहे.

## संदर्भ


१) "मी एक कार्यकर्ता : षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र.२४४.

२) "श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना ४१ वा वार्षिक अहवाल", पृष्ठ क्र. १२.

३) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ मे १९९०", पृष्ठ क्र.१९८.

४) प्रा. डॉ. गुरूनाथ नाडगोंडे : "अमृत तरंग", पृष्ठ क्र. ५९.

५) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ मे १९९०", पृष्ठ क्र.२००.

६) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. २३५.

७) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. २३६.

८) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. २३७.

९) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ मे १९९०", पृष्ठ क्र.२११.

१०) "३५ वा वार्षिक अहवाल श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर", पृष्ठ क्र. २०.

११) "३५ वा वार्षिक अहवाल श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर", पृष्ठ क्र. २०.

१२) "मुलाखत शरद आ. महाजन, जनरल मॅनेजर वारणा बझार", दि. ११/४/२००१.

१३) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ मे १९९०", पृष्ठ क्र.२२४.

१४) "मुलाखत शरद आ. महाजन, जनरल मॅनेजर आणि अरूणा तुकाराम गुरव सेवक, वारणा बझार", दि. ११/४/२००१.

१५) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ मे १९९०", पृष्ठ क्र.२३१.

१६) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ मे १९९०", पृष्ठ क्र.२३५.

१७) "४३ वा वार्षिक अहवाल तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर", पृष्ठ क्र. १६.

****